# अधिसूचना

सामान्य प्रशासन विभाग,(माहिती तंत्रज्ञान)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०३ मार्च,२०२०

महाराष्ट्र आधार (वित्तीय) व इतर अर्थसहाय्य लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६

क्रमांक. डीबीटी २०१९/प्र.क्र.१७०/कक्ष-१/३९- ज्याअर्थी, सेवा किंवा लाभ यांचे वितरण करण्यासाठी ओळख पटविण्याचे दस्ताऐवज म्हणून, आधारचा वापर करण्यामुळे राज्य शासनाची वितरण प्रक्रिया सुलभ होते, पारदर्शकता व कार्यक्षमता येते, आणि लाभार्थ्यांना त्यांचे लाभ, थेटपणे सोईस्कर व अखंड रीतीने आणि एखादया व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी बहुविध दस्तऐवज सादर करण्याची गरज टाळून, थेटपणे मिळणे शक्य होते.

आणि ज्याअर्थी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग सामाजिक न्याय विशष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्ग, कल्याण विभाग (यात यापुढे ज्यांचा निर्देश "विभाग" असा केलेला आहे) हे, मेसर्स महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यात त्यापुढे ज्याचा निर्देश "अंमजबजावणी अभिकरण" असा केलेला आहे) यांच्यामार्फत राबविण्यात येत असणा-या यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या योजनांचे (यात यापुढे ज्याचा निर्देश "योजना" असा केला आहे) लाभ किंवा अर्थसहाय्यांचे वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्यात संवितरण करण्यासाठी व्यवस्थापन करीत .

आणि ज्याअर्थी, योजनेअंतर्गत अंमलबजावणी अभिकरणाकडून योजनेच्या विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार वैयक्तिक लाभार्थ्यांना (यात यापुढे ज्यांचा निर्देश " लाभार्थी" असा केला )
लाभांचे किंवा अर्थसहाय्यांचे (यात यापुढे ज्याचा निर्देश "लाभ" असा केलेला आहे) वितरण केले जाते.,

आणि ज्याअर्थी, उपरोक्त योजनांमध्ये, महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधून केलेला आवर्ती खर्च अंतर्भूत आहे.,

त्याअर्थी आता, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) याच्या कलम ७ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, याव्दारे, पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे:-

१) योजनेअंतर्गत, लाभ मिळण्यासाठी पात्र असणाऱ्या एखाद्या वैयक्तिक लाभार्थ्याने, याव्दारे,आधार क्रमांक असल्याचा पुरावा सादर करणे किंवा आधार क्रमांकाचे अधिप्रमाणन करुन घेणे आवश्यक असेल.

२) ज्याच्याकडे आधार क्रमांक नाही किंवा ज्याने अदयाप आधारसाठी नावनोंदणी केलेली नाही अशा या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी पात्र असलेल्या कोणत्याही वैयक्तिक लाभार्थ्याने योजनेसाठी नावनोंदणी करण्यापूर्वी, आधार नाव नोंदणीकरिता अर्ज करणे आवश्यक असेल. परंतु, ती व्यक्ती उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार आधार क्रमांक प्राप्त करण्यासाठी हक्कदार असली पाहिजे आणि अशी

व्यक्ती आधार नावनोंदणी करुन घेण्यासाठी कोणत्याही आधार नावनोंदणी केंद्रास (भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण) (युएआयडीएआय) (संकेतस्थळ : डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू, युआयडीएआय.जी.ओव्ही. आयएन येथे उपलब्ध असलेली सूची) भेट देऊ शकेल..

३) आधार (नोंदणी व अद्ययावत) विनियम, २०१६ यांच्या विनियम १२ नुसार, विभागाने, त्याच्या अंमलजबजावणी अभिकरणामार्फत, ज्यांनी अद्याप आधारसाठी नोंदणी केली नाही अशा लाभार्थ्यांकरिता आधार नोंदणी सुविधा देणे आवश्यक आहे आणि जर संबंधित गटात किंवा तालुक्यात किंवा तहसिलात कोणतेही आधार नोंदणी केंद्र स्थित नसेल तर विभाग त्याच्या अंमलजबजावणी अभिकरणामार्फत, युआयडीएआयच्या विद्यमान निबंधकाच्या समन्वयाने किंवा स्वत: युआयडीएआयचे निबंधक होऊन सोयीच्या ठिकाणी आधार नोंदणी सुविधा केंद्र सुरु करील.

परंतु, वैयक्तिक लाभार्थ्यास, आधार क्रमांक नेमून देईपर्यंत योजनेअन्वये आवश्यक असलेले दस्तऐवज सादर करण्यास अधीन राहून, अशा व्यक्तीला योजनेखालील लाभ, देण्यात येतील, ते असे :-

(क)

(एक) जर व्यक्तीने आधार नोंदणी केली असेल तर, त्याची/तिची आधार नोंदणी ओळख चिठ्ठी; किंवा

(दोन) जर बालकाने पाच वर्षे वय पूर्ण केल्यानंतर, नाव नोंदविण्यात आले असेल तर, (बायोमेट्रिक नमुने घेतल्यानंतर) त्याची/ तिची आधार नोंदणी ओळख चिठठी किंवा अद्ययावत बायोमेट्रिक ओळख ; आणि

(ख) वैयक्तिक लाभार्थ्यासाठी पुढील दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज :-

(एक) बॅंक किंवा डाक कार्यालयाची छायाचित्र असलेली खाते पुस्तिका ; किंवा

(दोन) पॅन कार्ड ; किंवा

(तीन) पारपत्र (पासपोर्ट) ; किंवा

(चार) शिधापत्रक ; किंवा

(पाच) मतदार ओळख पत्र ; किंवा

(सहा) मनरेगा पत्र ; किंवा

(सात) छायाचित्र असलेली किसान खाते पुस्तिका ; किंवा

(आठ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) यान्वये लायसन देणाऱ्या प्राधिकरणाने दिलेले वाहन चालन लायसन ; किंवा

(नऊ) राजपत्रित अधिका-यानं किंवा तहसिलदाराने कार्यालयीन नाममुद्रित पत्रावर दिलेले व्यक्तीचे छायाचित्र असलेले ओळख प्रमाणपत्र ; किंवा

(दहा) विभागाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कोणतेही दस्तऐवज.

(ग) बालक/बालके लाभार्थ्यांसाठी पुढीलपैकी कोणतीही एक दस्तऐवज :-

(एक) जन्माचा दाखला ; किंवा समुचित प्राधिकरणाने दिलेला जन्माचा अभिलेख; किंवा

(दोन) पालकाचे नाव असलेले, शाळेच्या मुख्याध्यापकाने यथोचितरित्या स्वाक्षरीत केलेले शाळेचे ओळख पत्र ; आणि

(घ) विद्यमान योजनेच्या मार्गदर्शकतत्त्वांनुसार लाभार्थ्याचा पालकाशी किंवा कायदेशीर पालकाशी असलेल्या नात्याचा पुरावा म्हणून पुढील दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज :-

(एक) जन्माचा दाखला ; किंवा समुचित प्राधिकरणाने दिलेला जन्माचा अभिलेख ; किंवा

(दोन) शिधापत्रिका ; किंवा

(तीन) माजी सैनिक/ अंशदायी आरोग्य योजना पत्रक (ई सी एच एस) ; किंवा राज्य कामगार विमा महामंडळ (ई एस आय सी ) पत्र ; किंवा केंद्र सरकार आरोग्य योजना ( सी जी एच एस ) पत्र ; किंवा

(चार) निवृत्तीवेतन पत्र ; किंवा

(पाच) सेना कॅंटिन पत्र ; किंवा

(सहा) कोणतेही सरकारी कुंटुंब हक्कपत्र ; किंवा

(सात) विभागाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कोणताही दस्तऐवज:

परंतु, आणखी असे की, त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाच्या प्रशासनाने विशेषरीत्या नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याव्दारे वरील दस्तऐवज तपासण्यात येतील.

२. योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना सुलभतेने लाभ पुरविणाच्या दृष्टीने उक्त आवश्यक बाबींची लाभार्थ्यांना जाणीव करुन देण्याकरिता माध्यमांमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल याची सुनिश्चिती करण्यासाठी विभाग अंमजबजावणी अभिकरणामार्फत (एजन्सीमार्फत) आवश्यक त्या सर्व व्यवस्था करील.

३. जेव्हा लाभार्थ्याच्या निकृष्ट बायोमेट्रिक्समुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आधार अधि प्रमाणण नि:ष्फळ झाले असेल तेव्हा, अशा सर्व प्रकरणी पुढील सुधारात्मक कार्यतंत्र अवलंबिण्यात येईल :-

(क) अधिप्रमाणनासाठी निकृष्ट दर्जाचा बोटाच्या ठशांच्या प्रकरणी डोळयातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅन करण्याची (आयरिस स्कॅन) किंवा चेह-याचे अधिप्रमाणन करण्याची सुविधा अंगिकारण्यात येईल त्यामुळे, विभाग त्यांच्या अभिकरणांमार्फत अखंडरितीने लाभ देण्यासाठी बोटाच्या ठशाच्या

अधिप्रमाणनासह डोळयातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅनरची (आयरिस स्कॅनर) किंवा चेहरा अधिप्रमाणनाची तरतूद करील.

(ख) बोटाची ठसे घेणे किंवा डोळयातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅन (आयरिस स्कॅन) करणे किंवा चेहऱ्याचे अधिप्रमाणन करणे यांमार्फत बायोमेट्रिक अधिप्रमाणन यशस्वी होत नसेल तर, जेव्हा जेव्हा, आधारव्दारे अनुज्ञेय अधिप्रमाणन शक्य असेल तेव्हा एक वेळ परवलीचा शब्द (पासवर्ड) किंवा यथास्थित, मर्यादित काळ वैधता असलेला वेळ आधारित एक वेळ परवलीचा शब्द (पासवर्ड) देण्यात येईल.

(ग) इतर सर्व प्रकरणी, जेव्हा बायोमेट्रिक किंवा आधार एक वेळ परवलीचा शब्द (पासवर्ड) किंवा वेळ आधारित एक वेळ परवलीचा शब्द (पासवर्ड) शक्य नसेल, अशा इतर सर्व प्रकरणी प्रत्यक्ष आधार पत्राच्या आधारे योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतील, त्याची अधिप्रमाणता आधार पत्रावर मुद्रित केलेल्या शीघ्र प्रतिसाद संकेतांकामार्फत (क्युआरकोड) पडताळता येऊ शकते आणि विभागाव्दारे अंमलबजावणी अभिकरणामार्फत (एजन्सीमार्फत) सोईस्कर ठिकाणी शीघ्र प्रतिसाद सांकेताक (क्यूआरकोड) वाचकाची आवश्यक ती व्यवस्था पुरविण्यात येईल.

४. वरील बाबींशिवाय, योजनेअंतर्गत कोणताही खराखुरा लाभार्थी, त्याच्या देय लाभापासून वंचित राहणार नाही याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, विभाग, त्यांच्या अंमजबजावणी अभिकरणामार्फत (एजन्सीमार्फत) थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) मिशनचे कार्यालयीन ज्ञापन, मंत्रिमंडळ सचिवालय, भारत सरकार दिनांक १९ डिसेंबर, २०१७ यामध्ये रुपरेषा दिल्याप्रमाणे अपवादात्मक हाताळणी यंत्रणेचे अनुसरण करील.

५. यात यावर काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बालकास अधिप्रमाणन करताना त्याची किंवा तिची ओळख सिध्द करता आली नाही, किंवा आधार क्रमांक असल्याचा पुरावा देता आला नाही अशा कोणत्याही बालकास किंवा नोंदणीसाठी अर्ज सादर करुन ज्याला आधार क्रमांक नेमून दिलेला नाही अशा बालकाच्या बाबतीत योजनेखालील लाभ नाकारण्यात येणार नाही. परिच्छेद १ च्या उप - परिच्छेद (३) च्या परंतुकाच्या खंड (ख) व (ग) मध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर दस्तऐवजांच्या आधारे त्याची किंवा तिची ओळख पडताळून त्याला किंवा तिला लाभ देण्यात येईल आणि जेव्हा अशा इतर दस्तऐवजांच्या आधारे लाभ दिला जातो तेव्हा, त्याचा अभिलेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल, त्याचा विभाग त्यांच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत (एजन्सी) त्याचा नियतकालिक आढावा येईल आणि त्याचे लेखापरीक्षण करील.

६. ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

<u>अनुसूची</u>

| अनु.क्र. | विभाग | योजना | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (डी ओए) | कला संचालनालय |
| २ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी) | <u>कला संचालनालय</u> |
| ३ | | गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती सहाय्य - कनिष्ठ स्तर | उच्च शिक्षण संचालनालय |
| ४ | | गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती सहाय्य- वरिष्ठ स्तर | उच्च शिक्षण संचालनालय |
| ५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (डीएचई) | उच्च शिक्षण संचालनालय |
| ६ | | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत | उच्च शिक्षण संचालनालय |
| ७ | | माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत | उच्च शिक्षण संचालनालय |
| ८ | | एकलव्य शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| ९ | | शासन अधिछात्रवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| १० | | शासन विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| ११ | | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| १२ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | उच्च शिक्षण संचालनालय |
| १३ | | गणित, भौतिकशास्त्र विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवंत शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| १४ | | राज्य शासन दक्षिणा अधिछात्र शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| १५ | | राज्य शासन खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | उच्च शिक्षण संचालनालय |
| १६ | | राज्य अल्पसंख्याक शिष्यवृत्ती भाग दोन (डी एच ई ) | उच्च शिक्षण संचालनालय |
| १७ | | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (डीटीई) | तंत्र शिक्षण संचालनालय |
| १८ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी) | तंत्र शिक्षण संचालनालय |
| १९ | | उच्च व व्यावसायिक पाठयक्रम शिकणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती (डीटीई) | तंत्र शिक्षण संचालनालय |
| २० | वैद्यकिय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता | वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय |
| २१ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज फी प्रतिपूर्ती योजना | वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय |
| २२ | | उच्च व व्यावसायिक पाठयक्रम शिकणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (डीएमईआर) | वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (एमराएफएसयु) | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ (एम रा एफ एस यु) |
| २४ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई बी सी) | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ (एमएएफएसयु) |
| २५ | | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (ए जी आर) | महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद (एमसीएईआर) |
| २६ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई बी सी) | महाराष्ट्र कृषि, शिक्षण व संशोधन परिषद (एम सी ए ई आर) |
| २७ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | आर्थिकदृष्टया मागास वर्गातील विद्यार्थ्याकरिता गुणवत्ता शिष्यवृत्ती | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग |
| २८ | | कनिष्ठ महाविद्यालयातील खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग |
| २९ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ३० | | व्यावसायिक पाठयक्रम शिकणाऱ्या विदयार्थ्याकरिता निर्वाह भत्ता | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ३१ | | विकलांग व्यक्तीकरिता मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ३२ | | मॅट्रिकोत्तर टयुशन फी व परीक्षा फी (फी सवलत) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ३३ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ३४ | आदिवासी विकास विभाग | मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (भारत सरकार) | आदिवासी विकास विभाग |
| ३५ | | आदिवासी विदयार्थ्याकरिता टयुशन फी व परीक्षा फी (फी सवलत) | आदिवासी विकास विभाग |
| ३६ | | व्यावसायिक शिक्षण फी प्रतिपूर्ती | आदिवासी विकास विभाग |
| ३७ | | व्यावसायिक शिक्षण निर्वाह भत्ता | आदिवासी विकास विभाग |
| ३८ | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण (व्ही | व्यावसायिक पाठयक्रमात शिकत असणाऱ्या व व्यावसायिक महाविदयालयाना जोडलेल्या वसतिगृहात राहणाऱ्या विजाभज (व्ही जे एनटी) व विमाप्र (एस बी सी) विदयार्थ्याना निर्वाह भत्त्यांचे प्रदान | विजाभज (व्हीजेएनटी) इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ३९ | | मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती इतर मागासवर्गीय विदयार्थ्याना | विजाभज (व्हीजेएनटी) इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | जे एन टी) विभाग | विमाप्र (एसबी सी) विदयार्थ्यांना मॅर्टिकोत्तर शिष्यवृत्ती | विजाभज (व्हीजेएनटी) इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ४१ | | विजाभज (व्हीजेएनटी) विदयार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | विजाभज (व्हीजेएनटी), इमाव (ओ बी सी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ४२ | | विजाभज (व्हीजेएन टी) व विमा (एस बी सी) प्रवर्गाच्या ११ वी व १२ वी मध्ये शिकत असणाऱ्या विदयार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती | विजाभज (व्हीजएनटी), इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ४३ | | इमाव (ओ बी सी) विदयार्थ्यांना टयुशन फी व परीक्षा फी | विजाभज (व्हीजेएनटी), इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ४४ | | विमाप्र (एसबीसी) विदयार्थ्यांना टयुशन फी व परीक्षा फी | विजाभज (व्हीजेएनटी), इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |
| ४५ | | विजाभज (व्हीजएनटी) विदयार्थ्यांना टयुशन फी व परीक्षा फी | विजाभज (व्हीजेएनटी), इमाव (ओबीसी) व विमाप्र (एसबीसी) कल्याण विभाग |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाती म्हसे-पाटील, भा.प्र.से.)
शासनाचे सहसचिव

# NOTIFICATION

General Administration Department (I.T)
Madam Cama Marg,
Hutama Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400032.
Dated: 03 March, 2020.

Aadhaar (Targeted Delivery of Financial and other Subsidies Benefits and Services) Act, 2016

**DBT 2019/ CR. No. 170/ Sec 1/39.**- Whereas, use of Aadhaar number as identity for delivery of services or benefits or subsidies simplifies the State Government, delivery processes, brings transparency and effiencey and enables beneficiaries to get their entitlement directly in a convenient and seamless manner and by obviating the need to produce the multiple documents to prove one's identity;

And whereas, the Higher and Technical Education Department, Medical Education and Drug Department, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development & Fisheries Department, School Education and Sports Department, Social Justice and Special Assistance Department, Tribal Development Department, and Vimukta Jati, Nomadic Tribes, Other Backward Class and Special Backward Class Welfare (VJNT) Department (hereinafter referred to as "the Departments"), are administering the Schemes mentioned in **Schedule** appended hereto (hereinafter referred as "the Schemes") to disburse the benefits/subsidies to individuals Aadhaar linked bank accounts which are being implemented through M/s Maharashtra Information Technology Corporation Limited (MahaIT) (hereinafter referred as "the implementing agency").

And whereas, under the scheme delivery of benefits or subsidies (herein referred to as "the benefit") are disbursed to the Individual beneficiaries (hereinafter referred to as "the beneficiaries") by the implementing agency as per the extant Schemes guidelines;

And whereas the aforesaid Schemes involves recurring expenditure incurred from the Consolidated Fund of the State of Maharashtra;

Now, therefore, in pursuance of the provisions of **section 7** of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and other Subsidies, Benefits and

Services) Act, 2016 (18 of 2016) (hereinafter referred to as the said Act), the Government of Maharashtra hereby notifies the following, namely: –

1.

1) An individual beneficiary eligible for receiving the benefits under the Scheme shall hereby be required to furnish proof of possession of Aadhaar number or undergo Aadhaar authentication.
2) Any individual beneficiary eligible for receiving the benefit under the Schemes, who does not possess the Aadhaar number or, has not yet enrolled for Aadhaar, shall be required to make application for Aadhaar enrolment before registering for the scheme provided individual is entitled to obtain Aadhaar as per Section-3 of the said Act and such individuals may visit any Aadhaar enrolment centre (List available at Unique Identification Authority of India (UIDAI) (website: www.uidai.gov.in) to get enrolled for Aadhaar.
3) As per **regulation 12** of the Aadhaar (Enrolment and Update) Regulations, 2016, the Department through its implementing agency, is required to offer Aadhaar enrolment facilities for the beneficiaries who are not yet enrolled for Aadhaar and in case there is no Aadhaar enrolment centre located in the respective Block or Taluka or Tehsil , the Department through its implementing agency shall provide Aadhaar enrolment facilities at convenient locations in co-ordination with the existing Registrars of UIDAI or becoming UIDAI Registrar themselves:

   Provided that, till the time Aadhaar is assigned to the individual beneficiary, benefits under the Scheme shall be given to such individual, subject to the production of the documents required under the schemes, namely: -

(a)

   i. if individual has enrolled, his/her Aadhaar Enrolment ID slip; or
   ii. if the child has been enrolled after attaining the age of five years (with biometrics collection), his/her Aadhaar Enrolment Identification slip, or of bio-metric update identification;

and

(b) any one of the following documents for **individual** beneficiary, namely:-

(i) Bank or post office passbook with photograph, or

(ii) Permanent Account Number (PAN) Card; or

(iii) Passport; or

(iv) Ration Card; or

(v) Voter identity card; or

(vi) MGNREGA card; or

(vii) Kisan photo passbook; or

(viii) Driving license issued by the Licensing Authority under the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988); or

(ix) Certificate of Identity having photo of individual issued by a Gazetted Officer on an Official letter head; or

(x) Any other documents as specified by the Department

(c ) any one of the following documents for **child/Children** beneficiary, namely:-

(i) Birth Certificate; or Record of birth issued by the appropriate authority; or

(ii) School identity card, duly signed by the Principal of the school, containing parent's names; and

(d) any one of the following documents as proof of relationship of the beneficiary with the parent or legal guardian as per the extant Scheme guidelines, namely:-

(i) Birth Certificate; or Record of birth issued by the appropriate authority; or

(ii) Ration Card; or

(iii) Ex-Servicemen Contributory Health Scheme (ECHS) Card; or Employees' State Insurance Corporation (ESIC) Card; or Central Government Health Scheme (CGHS) Card; or

(iv) Pension Card; or

(v) Army Canteen Card; or

(vi) Any Government Family Entitlement Card; or

(vii) Any other document as specified by the Department;

Provided further that, the above documents shall be checked by an officer specifically designated by the State Government Administration for that purpose.

2. In order to provide benefits to the beneficiaries under the Scheme conveniently, the Department through implementing agency shall make all the required arrangements to ensure that wide publicity through the media shall be given to the beneficiaries to make them aware of the said requirement.

3. In all cases where Aadhaar authentication fails due to poor biometrics of the beneficiaries or due to any other reason, the following remedial mechanism shall be adopted namely:-
   (a) in case of poor finger print quality, IRIS scan or face authentication facility shall be adopted for authentication, thereby the Department through its implementing agency shall make provision for IRIS scanners or face authentication along with finger print authentication for delivery of benefits in seamless manner;
   (b) in case of biometric authentication through fingerprints or IRIS scan or face authentication is not successful whenever feasible an admissible authentication by Aadhaar One Time Password or Time- Based One Time Password with limited time validity as the case may be, shall be offered;
   (c) in all other cases where biometric or Aadhaar One Time Password or Time- Based One Time Password is not possible benefits under the scheme will be given on the basis of physical Aadhaar letters whose authenticity can be verified through the Quick Response Code printed on the Aadhaar letter and the necessary arrangements of Quick Response Code reader shall be provided at the convenient locations by the Department through implementing Agency.

4. In addition to above, in order to ensure that no bonafide beneficiaries under the scheme is deprived of his due benefits, the department through its implementing agency shall follow the exception handling mechanism as

outlined in the office Memorandum of DBT Mission, Cabinet Seceratariat, Government of India, dated 19th December 2017.

5. Notwithstanding anything contained hereinabove, no child shall be denied benefit under the Scheme in case of failure to establish his or her identity by undergoing authentication, or furnishing proof of possession of Aadhaar number, or in the case of a child to whim no Aadhaar number has been assigned, producing an application for enrolment. The benefit shall be given to him/her by verifying his or her identity on the basis of other documents as mentioned in clauses (b) and (c ) of the proviso of sub-paragraph (3) of paragraph 1, and where benefit is given on the basis of such other documents, a separate register shall be maintained to record the same, which shall be reviewed and audited periodically by the Department through its implementing Agency.

6. This notification shall come into effect from the date of publication in the Maharashtra Government Gazette.

**SCHEDULE**

| Sr.No | Department | Scheme | Offices |
|---|---|---|---|
| 1 | Higher and Technical Education Department | Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (DOA) | Directorate of Arts |
| 2 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | Directorate of Arts |
| 3 | | Assistance to Meritorious Students scholarship - Junior Level | Directorate of Higher Education |
| 4 | | Assistance to Meritorious Students scholarship - Senior Level | Directorate of Higher Education |
| 5 | | Dr. Punjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (DHE) | Directorate of Higher Education |
| 6 | | Education Concession to the Children Freedom Fighter | Directorate of Higher Education |
| 7 | | Education Concession to the Children of Ex-Servicemen | Directorate of Higher Education |
| 8 | | Eklavya Scholarship | Directorate of Higher Education |
| 9 | | Government Research Adhichatra | Directorate of Higher Education |
| 10 | | Government Vidyaniketan Scholarship | Directorate of Higher Education |
| 11 | | Jawaharlal Nehru University Scholarship | Directorate of Higher Education |

| Sr.No | Department | Scheme | Offices |
|---|---|---|---|
| 12 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Scheme | Directorate of Higher Education |
| 13 | | Scholarship to Meritorious students possessing Mathematics /Physics | Directorate of Higher Education |
| 14 | | State Government Daxshina Adhichatra Scholarship | Directorate of Higher Education |
| 15 | | State Government Open Merit Scholarship | Directorate of Higher Education |
| 16 | | State Minority Scholarship Part II (DHE) | Directorate of Higher Education |
| 17 | | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | Directorate of Technical Education |
| 18 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | Directorate of Technical Education |
| 19 | | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | Directorate of Technical Education |
| 20 | Medical Education and Drug Department | Dr Panjabrao Deshmukh Hostel Maintenance Allowance | Directorate of Medical Education and Research |
| 21 | | Rajarshri Chhatrapati Shahu Maharaj Fee Reimbursement Scheme | Directorate of Medical Education and Research |
| 22 | | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DMER) | Directorate of Medical Education and Research |
| 23 | Agriculture, Animal Husbandry, Dairy Development & Fisheries Department | Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (MAFSU) | Maharashtra Animal and Fishery Science University (MAFSU) |
| 24 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | Maharashtra Animal and Fishery Science University (MAFSU) |
| 25 | | Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (AGR) | Maharashtra Council of Agriculture Education and Research (MCAER) |
| 26 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | Maharashtra Council of Agriculture Education and Research (MCAER) |
| 27 | School Education and Sports Department | Merit Scholarships for Economically Backward Class Students | School Education and Sports Department |
| 28 | | Open Merit Scholarships in Junior College | School Education and Sports Department |
| 29 | Social Justice and Special | Government of India Post-Matric Scholarship | Social Justice and Special Assistance Department |

| Sr.No | Department | Scheme | Offices |
|---|---|---|---|
| 30 | Assistance Department | Maintenance Allowance for student Studying in professional courses | Social Justice and Special Assistance Department |
| 31 | | Post-Matric Scholarship for persons with disability | Social Justice and Special Assistance Department |
| 32 | | Post-Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship) | Social Justice and Special Assistance Department |
| 33 | | Rajarshri Chhatrapati Shahu Maharaj Merit Scholarship | Social Justice and Special Assistance Department |
| 34 | Tribal Development Department | Post Matric Scholarship Scheme (Government Of India ) | Tribal Development Department |
| 35 | | Tuition Fee & Exam Fee for Tribal Students ( Freeship) | Tribal Development Department |
| 36 | | Vocational Education Fee Reimbursement | Tribal Development Department |
| 37 | | Vocational Education Maintenance Allowance | Tribal Development Department |
| 38 | Vimukta Jati, Nomadic Tribes, Other Backward Class and Special Backward Class Welfare (VJNT) Department | Payment of Maintenance Allowance to VJNT and SBC Students Studying in Professional Courses and Living in Hostel Attached to Professional Colleges | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 39 | | Post Matric Scholarship to OBC Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 40 | | Post Matric Scholarship to SBC Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 41 | | Post Matric Scholarship to VJNT Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 42 | | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Merit Scholarship for students studying in 11th & 12th standard of VJNT & SBC category | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |

| Sr.No | Department | Scheme | Offices |
|---|---|---|---|
| 43 | | Tuition Fees and Examination Fees to OBC Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 44 | | Tuition Fees and Examination Fees to SBC Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |
| 45 | | Tuition Fees and Examination Fees to VJNT Students | Vimukta Jati Nomadic Tribe, Other Backward Class and Special Backward Class Welfare Department |

By order and in the name of the

Governor of Maharashtra

(Swati Mhase-Patil, IAS)

Joint Secretary to Government